नि.दि.दा.क्र. ११०/२०१२ मधील नि.क्र. ७८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

२. वादींच्या कथनानुसार वादी यांनी प्रस्तुतचा दावा दावा कलम १ मिळकतींचे वाटप होवून त्याचे हिश्श्याचे तुटक व राहरास्त वाटप करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. मुळ वादीच्या वयोमानामुळे व नजरचुकीने वादी व प्रतिवादी व अन्य सहहिस्सेदारांच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती नमूद करावयाच्या राहून गेल्या आहेत. सदरच्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादींनी आपल्या कैफियतीमध्ये दाव्यास आवश्यक मिळकती सामिल नसल्याची हरकत घेतली आहे. त्यामुळे सदर मिळकती व सदर मिळकतींमधील सहहिस्सेदारांना याकमी पक्षकार करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने त्यांच्या हिस्सेराशी, व दाव्याच्या आकारणीमध्ये दुरुस्ती व विनंती कलमामध्ये आवश्यक ती दुरुस्ती मागितली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ नि. ८७ येथे म्हणणे दाखल केले आहे त्याच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत कामी मुद्दे काढण्यात आलेले असून वादींनी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे त्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण वादीच्या उलट तपासावर प्रलंबित असताना प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दाव्याची चौकशी सुरु झालेली असताना वादीना सदरची दुरुस्ती करण्याची तत्परता यापुर्वीच दाखविता आली असती मात्र वादीने मागील सहा वर्षामध्ये सदरची तत्परता दाखविली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या परंतुकाचा फायदा वादीस घेता येणार नाही. वादीचा अर्ज बेकायदेशीर असून सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ ने केली आहे.

४. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मी मां सा

५. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दोन्ही बाजूंचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदरीत वस्तुस्थिती विचारात घेता सदरचा दावा हा वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केली असून कैफियतीमध्ये वादीने दाव्यात आवश्यक मिळकती सामिल केले नसल्याची हरकत घेतली आहे. प्रस्तुत कामी वाद मुद्दे काढण्यात आल्यानंतर वादीच्या उलट तपासाकरीता प्रकरण प्रलंबित असताना वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ च्या परंतुकानुसार न्यायचौकशी सुरु झाल्यानुसार पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवून सुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीच्या उलट तपासाकरीता प्रकरण प्रलंबित असताना वादीने दुरुस्ती मागितली आहे. प्रतिवादीने आपल्या कैफियतीमध्ये सामाईक मिळकत सामिल केल्या नसल्याची हरकत घेतली आहे. प्रतिवादीने घेतलेल्या हरकतीच्या आधारेच वादी दाव्यामध्ये दुरुस्ती करत आहे असे वादीचे स्पष्ट कथन आहे. परंतु ही दुरुस्ती वादीने योग्य खबरदारी घेवून केली आहे का ? हे पाहणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ ने

दिनांक ०८/०६/२०१५ रोजी कैफियत दिल्यानंतर दि. ५५ येथे मुद्दे काढले आहेत. वादीने दि. १६/१२/२०१५ रोजी सरतपासाचे दाखल केले असून त्याच दिवशी वादीच्या मुखत्याराचा जादा सरतपास घेण्यात आलेला आहे. दरम्यान दोन्ही वादी मयत झाले आहेत नि. ७६ अन्वये वादींचे वारस रेकॉर्डवर आणण्यात आलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०८/०६/२०१५ रोजी कैफियत देवून आवश्यक मिळकती सामिल नसल्याची उणीव असलेबाबत हरकत घेतली आहे. वादीने आवश्यक मिळकती सामिल करुन घेणेबाबत ३ वर्षे इतका दिर्घ विलंब का केला याचा कोणताही खुलासा वादीने केलेला नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. ६ नियम १७ च्या परंतुकानुसार वादीने योग्य ती खबरदारी घेतली नसल्याचे दिसून येते. तथापि वादीचा दावा हा वाटपाचा असून आवश्यक मिळकती व आवश्यक मिळकती सामिल केलेखेरीज दावा चालण्यास पात्र ठरत नाही ही बाब स्पष्ट आहे. त्यामुळे प्रतिवादींनी घेतलेल्या आवश्यक पक्षकारांच्या उणिवेच्या आक्षेपानुसार जर वादीस दाव्यात आवश्यक मिळकती व आवश्यक पक्षकार सामिल करण्यास परवानगी न दिल्यास तांत्रिक मुद्दयाच्या आधारे वादीचा दावा फेटाळण्यात येण्याची शक्यता आहे तसेच आवश्यक पक्षकाराविना दावा फेटाळल्यानंतर अपिल कोर्टामध्ये आदेश होवून दाव्यामध्ये आवश्यक मिळकती व पक्षकारांना सामिल करुन घेण्यात येवून दावा पुन्हा फेरफैलावर घेवून चौकशी होण्याची देखील शक्यता आहे.

८. मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या <u>शिवानंद अशोक हिरेमठ व इतर वि. दिपक अशोक हिरेमठ व इतर, २०१८ (१) ऑल एम.आर ३३९</u> या न्यायनिर्णयामध्ये वाटपाच्या दाव्यामध्ये आवश्यक मिळकती पक्षकार सामिल करणेबाबत न्यायालय स्वतः क्रम १ नियम १०(२) अन्वये वादीस सुचना करु शकते. वाटपाचा दावा हा सहमालकांना दाव्यात समाविष्ठ केल्याखेरीज चालू शकत नाही.

९. वर नमूद न्यायनिवाडयामधील प्रकरणामध्ये वाटपाच्या दाव्यामध्ये कुटूंब प्रमुख व इतर सदस्यांना प्रतिवादी म्हणून सामिल करण्यात आले नव्हते. तसेच महाराष्ट राज्याबाहेरील अन्य मिळकती देखील दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात आल्या नव्हत्या. दावा हा आवश्यक पक्षकार व आवश्यक मिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ केल्या नाहीत या कारणावरुन आव्हानीत करण्यात आला होता. पुरावा संपल्यानंतर दाव्यामध्ये पक्षकार व मिळकती समाविष्ठ करण्यासाठी वादीने दुरुस्ती सुचवली. वादीने कायदेशीर तरतूदींचे अज्ञान व वकीलांच्यावर अंधविश्वास ठेवल्यामुळे दावा दुरुस्ती करण्यास विलंब झाल्याचे कारण दिले होते. प्रतिवादींनी क्र. ६ नियम १७ च्या परंतुकानुसार दुरुस्तीस विरोध दर्शविला होता. या पार्श्वभूमीवर मा. मुंबई उच्च न्यायालयाने असा निर्वाळा दिला आहे की, वाटपाचा दावा हा सर्व सहमालक व हिस्सेदारांना सामिल केल्याखेरीज चालू शकत नाही. क्रम १ नियम १०(२) नुसार न्यायालयाला देखील न्यायाच्या हिताचे दृष्टीने वादीस दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार सामिल करण्याची सुचना देण्याचे स्वअधिकार आहेत. पक्षकाराच्या वकीलांच्या निष्काळजीपणामुळे वादीस अन्याय सोसावा लागू नये असे निरिक्षण नोंदविले आहे.

१०. वादीने दावा दुरुस्तीस केलेला विलंब हा अवाजवी व खुलासाहिन आहे. तथापि, दाव्यात आवश्यक मिळकती व पक्षकारांची उणिव हा तांत्रिक मुद्दा असल्यामुळे दुरुस्ती अभावी दाव्याची अंतिम चौकशी झाल्यास तांत्रिक मुद्दयाच्या आधारे दावा फेटाळला गेल्यास वादीवर अन्याय होणार आहे. दुरुस्तीमुळे होणा—या विलंबास वादी हाच कारणीभूत घटक बनणार आहे. विलंबाबाबत वादीने कोणतेही कारण अथवा खुलासा दिला नाही हे जरी खरे असले तरी वादाच्या समुळ निराकरणाकरीता दुरुस्ती आवश्यक आहे का ? हे पाहण्याची जबाबदारी न्यायालयावर सोपविण्यात आली असल्यामुळे दुरुस्तीस परवानगी नाकारल्यास पक्षकारांचे अहित होणार असून भविष्यात वेळेचा देखील अपव्यय होणार आहे. वाटपाचा दावा हा आवश्यक मिळकती व पक्षकारांखेरीज

चालू शकत नसल्यामुळे वादीच्या अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ च्या परंतुकाची बाधा येते असा निष्कर्ष काढता येवू शकत नाही.

११. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध न्यायनिवाडयानुसार दुरूस्ती मंजूर करण्यामागे दाव्यातील वाद परिणामकारकरित्या सोडवून दावेतील पक्षकारांचे हक्क ठरविणे आवश्यक आहे. वादी मागत असलेल्या दुरूस्तीचा मजकूर पाहिला असता त्याव्दारे मूळ दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. उलट सदर दुरूस्तीव्दारे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये करणे शक्य होणार असून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही.

१२. कायदयाच्या प्रस्थापित तत्वानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरूस्ती अर्ज विचारात घेताना दाव्याच्या गुणावगुणांचा विचार करणे जरूरीचे नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ याचा मूळ उद्‌देश असा आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मूळ मुद्‌दा शोधून काढण्यासाठी खरी परिस्थिती अभिलेखावर आणून योग्य व न्याय दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

१३. वर नमूद प्रस्थापित तत्व आणि अभिलेखावरील वस्तुस्थिती लक्षात घेता केवळ तांत्रिक बाबीच्या आधारे दावा फेटाळला गेल्यास वादीचे अहित व अन्याय टाळण्यासाठी वादीने मागितलेली दुरुस्ती न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. दुरुस्तीमुळे मूळ दाव्यात बदल होणार नाही अगर स्वरूपही बदलणार नाही. तथापि वादीने त्यास दुरुस्ती अर्ज फार पुर्वी देण्याची मुभा उपलब्ध असतानाही नाहक अवाजवी विलंब करुन अंतिम चौकशीवेळी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्ज दाखल करण्यास जवळ जवळ ३ वर्षे विलंब झालेला आहे. या बाबीचा विचार करुन वादीवर खर्च लादणे उचित वाटते. करिता मुद्‌दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देवून पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने प्रतिवादी क्र. १ या रू. ५००/— खर्चापोटी दयावेत व योग्य मुदतीत दावा दुरूस्ती करून पुढील पुर्तता करावी.

( सलीम अ. जमादार )
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी

दिनांक : २५/०७/२०१८.